महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे
२८, राणीचा बाग, जुने सर्किट हाउस जवळ , पुणे ४११००१
दूरध्वनी : ०२० - २६३६२०७१

क्र. आसंप्रसं/२०२३-२४/स्पर्धा परीक्षा/ का. ०४/2820 दि. ०१.०९.२०२३

# महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा संपूर्ण तयारी करिता दिल्ली येथील नामवंत खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण देणे योजना

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा संपूर्ण तयारी करिता दिल्ली येथील खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण घेणेसाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेण्यात येणार आहे. या करिता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून या योजनेच्या लाभासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेच्या लाभासाठी खालील सूचना ज्यामध्ये आवश्यक पात्रता, आवश्यक कागदपत्रे तसेच प्रशिक्षणातील सोयी सुविधा आणि सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) साठी अर्ज करतांना घ्यावयाची काळजी देण्यात आली आहे. उमेदवारांनी खालील सर्व मुद्दे वाचूनच सदर अर्ज सादर करायचा आहे. जर आपण खालील सूचना पूर्ण न वाचता अर्ज सादर केला आणि त्यात काही अडचणी उद्भवल्यास आपणास पुन्हा अर्ज सादर करता येणार नाही तसेच याबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून कोणत्याही प्रकारची सूट दिली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

## प्रशिक्षणार्थींची सदर योजनेसाठी सर्वसाधारण पात्रता व त्याबाबत मार्गदर्शक सूचना

१. उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा तसेच उपरोक्त परीक्षेसाठी शैक्षणिक अर्हता, वय व अर्जात नमूद केल्यानुसार इतर पात्रता व अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

२. उमेदवार महाराष्ट्र राज्यातील कमीत कमी ५ वर्षे रहिवासी/अधिवासी असला पाहिजे.

३. उमेदवाराची जमात ही महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादी मधील असणे अनिवार्य आहे.

४. प्रशिक्षणासाठी प्रवेश परीक्षा अर्ज करते वेळेस उमेदवाराकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate) तसेच अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र (Cast Validity) असणे बंधनकारक आहे. जर उमेदवारांकडे अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र (Cast Validity) नसेल तर अशा उमेदवारांनी सदर योजनेचा Online Application Form भरू नये तसेच याबाबत या कार्यालयात कोणतीही चौकशी करू नये.

५. उमेदवाराने जर MPSC किंवा इतर कोणत्याही परीक्षा/सरळसेवा परीक्षेबाबत अर्ज केले असल्यास त्याबाबतची माहिती सदर कार्यालयास कळविणे अनिवार्य आहे.

६. शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारास ह्या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येणार नाही. जर याबाबतची माहिती या कार्यालयापासून लपवून ठेवली आणि त्यांनतर जर या कार्यालयास सदर लपविलेली माहिती अवगत झाल्यास तात्काळ आपला प्रवेश रद्द करण्यात येईल व आपल्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच पुढे भविष्यात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७. आपण एखादी स्पर्धा परीक्षा पास झाले असल्यास किंवा कोणत्याही ठिकाणी कामासाठी रुजू होणार असल्यास अशा उमेदवारांनी सदर योजनेसाठी अर्ज करू नये. तसेच ज्या उमेदवारांची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाली आहे अथवा ज्यांची मुलाखत होणार आहे किंवा पूर्ण झाली आहे अशा उमेदवारांनी सदर योजनेसाठी अर्ज करू नये.

८. आपण सदर योजनेची CET उत्तीर्ण करून, मूळ कागदपत्रे तपासून घेऊन दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेत प्रवेशित झाल्यास आपणास सदरचा १२ महिने कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम पूर्णच करावा लागेल. या प्रशिक्षण कालावधी दरम्यान इतर कोणत्याही कारणास्तव आपण सदर प्रशिक्षण कार्यक्रम सोडू शकत नाहीत. आपण सदर प्रशिक्षण कार्यक्रम सोडल्यास आपल्याकडून प्रशिक्षणासाठी खर्च करण्यात आलेली प्रशिक्षण रक्कम आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २०.०४.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ०६ मध्ये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थाद्वारे वसूल करण्यात येईल.

**९. उमेदवारांनी आपला Online Application Form भरल्यानंतर सदर Form download करण्यासाठी ज्या दिवसापर्यंत मुदत दिली आहे. त्या दिवसापर्यंतच आपला Application Form प्रिंट करून घ्यावा. त्यानंतर उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत कार्यालयाकडून Application Form मिळणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**१०. उमेदवाराने अर्ज करते वेळी UPSC साठी लागणारी पात्रता पूर्ण होते की नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा आपला प्रवेश नाकारण्यात येईल.**

११. सदर सामायिक प्रवेश परीक्षेसाठी (CET) आपली कोणतीही मूळ कागदपत्रे न तपासता आपणास सदर परीक्षेस बसण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. याचा अर्थ आपण दिल्ली योजनेसाठी पात्र झालात असे होत नाही. सदर दिल्ली CET परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, आपले नाव निवड यादीत आल्यावर, आपल्याला आपली मूळ कागदपत्रे अनुसूचित जमात प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयामार्फत TRTI च्या वेबसाईटवर देण्यात आलेल्या सूचनेतील विहित कालावधीत तपासून घेणे अनिवार्य आहे. दिलेल्या विहित कालावधीत जर आपण आपले कागदपत्रे तपासून घेतली नाहीत/कार्यालयाशी याबाबत कोणताही संपर्क साधला नाहीत तर आपला प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**१२. उमेदवारांनी परीक्षेसाठी जे preference जिल्हे निवडले असतील तिथेच त्यांना परीक्षेसाठी उपस्थित राहावे लागेल.**

१३. **कोणत्याही उमेदवाराने एका पेक्षा जास्त अर्ज करू नये. तसेच आपला अर्ज भरतांना त्याचा User ID व मिळालेला password व्यवस्थित सांभाळून ठेवणे.**

१४. **उमेदवारांनी आपला Online Application Form काळजीपूर्वक भरावा, आपला आधार क्रमांक व आपला मोबाईल क्रमांक भरल्यावर जर form block झाला तर पुन्हा दुसऱ्यांदा उमेदवारांना form भरता येणार नाही तसेच किंवा कोणत्याही दुरुस्ती (update) करता येणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

१५. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात उमेदवाराने प्रवेश घेतल्यावर त्याला संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम करणे अनिवार्य आहे. उमेदवाराला मधेच प्रशिक्षण कार्यक्रम सोडून जाता येणार नाही.

१६. उमेदवाराने खोटे कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१७. उमेदवारास एकाच वर्षी सदर योजेनेचा व आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. प्रशिक्षण-२०२०/प्र.क्र.७५/का.-०९, दिनांक १३ नोव्हेंबर, २०२० अन्वये, संघ लोकसेवा आयोग मुख्य परीक्षा व मुलाखत तयारीसाठी देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन आर्थिक मदत योजना तसेच शासन निर्णय क्रमांक –प्रशिक्षण -२०१२/प्र.क्र. १५८ (भाग -२)/का. १७, दिनांक : १५ जुलै, २०१४ अन्वये, ०९ विद्यापीठामार्फत घेतल्या जाणाऱ्या UPSC/MPSC स्पर्धा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम या तीनही योजनेचा एकत्रित लाभ घेता येणार नाही. एका वेळेस एकाच योजेचा लाभ घेता येईल.

१८. उमेदवाराने सदर प्रवेश परीक्षा तसेच दिल्ली येथील प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रवेशापर्यंत ज्या काही संबधित सूचना असतील त्यासाठी वेळोवेळी TRTI च्या वेबसाईट भेट देणे अनिवार्य आहे. कोणत्याही उमेदवाराला परीक्षेबाबत किंवा त्या संबधित माहितीबाबत फोन करून कळवीले जाणार नाही. प्रवेश अर्ज सादर केल्यापासून ते दिल्ली प्रवेश प्रक्रियेपर्यंतचे महत्वाचे updates पाहण्यासाठी उमेदवाराने वेळोवेळी TRTI च्या वेबसाईट भेट देणे आवश्यक आहे.

१९. उमेदवाराने परीक्षेबाबतचे प्रवेश पत्र तसेच परीक्षेबाबत असलेल्या सूचनांची माहिती TRTI च्या वेबसाईटवरून **download** करावे.

२०. उमेदवाराने अर्जात नोंदविल्याव्यतिरिक्त TRTI ने कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करण्याचा आणि/किंवा इतर काही केंद्रे जोडण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अपरिहार्य परिस्थितीत कोणत्याही केंद्रावर उमेदवाराला परीक्षा केंद्र वाटप करण्याचा अधिकार TRTI ने राखून ठेवला आहे.

२१. प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवाराने धुम्रपान करणे, अंमली पदार्थाचे सेवन करणे, मद्यपान करणे, उद्धट वर्तन असे गैरप्रकार केल्यास/ आढळल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येऊन कायदेशीर/दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२२. आदिम जमातीच्या (PVTG) उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

२३. नियमानुसार मुली व दिव्यांग, अनाथ यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवल्या जातील. परंतु आरक्षित जागेवर महिला व दिव्यांग, अनाथ पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा अनुसूचित जमातीतील गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारास दिली जाईल.

२४. सदर प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रशिक्षणास ७५% उपस्थिती आवश्यक (अनिवार्य) आहे परंतु प्रशिक्षणार्थी गंभीर आजारी पडणे, अपघात होणे, इतर स्पर्धा परीक्षांना उपस्थित राहणे (नैसर्गिक आपत्ती/कौटुंबिक समस्या/वैद्यकीय कारण) या कारणामुळे कोचिंग क्लासेसला अनुपस्थित असल्यास अपवादात्मक परिस्थिती मध्ये प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन अदा करण्याबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल. यासाठी उमेदवाराला प्रवेशित संस्थेकडे रजेचा अर्ज करणे अनिवार्य आहे. जर उमेदवाराने रजेचा अर्ज दिला नाही आणि सदर प्रशिक्षण कार्यक्रमास अनुस्थित राहिले तर त्यांनी कोणत्याही कारणासाठी घेतलेली रजा मंजूर केली जाणार नाही. तसेच संबधित संस्थेला केला अर्ज आणि त्यावर संस्थेने दिलेली मान्यता याची स्कॅन कॉपी TRTI कार्यालयाला इमेलद्वारे पाठविणे अनिवार्य आहे.

**२५. अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थी व त्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८ लक्ष (अक्षरात रक्कम रु. आठ लक्ष फक्त) यापेक्षा कमी असावी. ज्यांचे उत्पन्न रु. ८ लक्षा पेक्षा जास्त आहे त्यांनी Online Application Form भरू नये किंवा याबाबत या कार्यालयात चौकशी करू नये.**

२६. ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांची निवड झाल्यानंतर तात्काळ दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेत रुजू होणे बंधनकारक असेल व ०७ दिवसाच्या आत रुजू करण्याचे हमीपत्र या कार्यालयास जमा करून जे उमेदवार दिलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत रुजू होत नाहीत, अशा उमेदवारांची निवड रद्द करून प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करून त्यांना प्रशिक्षणासाठी दिल्ली येथे पाठविण्यात येईल.

**अपवाद** – महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा इतर स्पर्धा परीक्षेच्या मुलाखत किंवा इतर बाबी संदर्भात समस्या उद्भवल्यास त्याची कारण मीमांसा करून योग्य निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

२७. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेने (Empanel) नामिका सूचीसाठी श्रीराम'स आय.ए.एस., नवी दिल्ली (sriram's IAS, New Delhi) या संस्थेचा समावेश केला आहे. सदर संस्थेस सामान्य अध्ययन या विषयाची पूर्व+मुख्य तसेच मुलाखत व वैकल्पिक विषय तयारी, व्याख्यात्यांचे मानधन, स्टडी मटेरीअल, नोटस् (वाचन साहित्य) टेस्ट सिरीज, आवश्यक वतर्मानपत्र, मासिके, पुस्तके स्टेशनरी इ. पुरविणे तसेच प्रशिक्षणाच्या इतर अनुषंगिक खर्च यासाठी शासनाने निश्चित केलेली फी अदा करण्यात येईल.

❖ **सूचना : सदर योजनेसाठी https://trti.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंकवरून ऑनलाईन स्वरूपातच केलेले अर्ज स्वीकारले जातील.**

**सदर योजनेसाठी आवश्यक शैक्षणिक तसेच इतर कागदपत्रे पुढीलप्रमाणे : -**

**(खाली नमूद सर्व आवश्यक कागदपत्रे ही फक्त PDF format मध्ये Size between 100 - 300 KB मध्ये स्कॅन केलेली असावीत.)**

१. अनुसूचित जमातीचे मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

२. अनुसूचित जमातीचे वैधता मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

३. दहावी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

४. बारावी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

५. पदवी गुण पत्र किंवा मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

६. डोमिसाईल मूळ प्रमाणपत्र स्कॅन प्रत

७. आधारकार्ड मूळ छायांकित स्कॅन प्रत

८. आधारकार्ड लिंक असलेले मूळ बँक तपशील – पास बुक स्कॅन प्रत

९. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला मूळ उत्पन्नाचा दाखला स्कॅन प्रत

१०. दिव्यांग असल्यास, जिल्हा शल्य चिकित्सक (सिव्हील सर्जन) यांनी निर्गमित केलेला दिव्यांगत्वाचा दाखल्याची स्कॅन प्रत.

११. अनाथ असल्यास, उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला अनाथाचा दाखला स्कॅन प्रत.

१. अद्यावत फोटोग्राफ (Only JPG or JPEG; Size between 50 – 100 KB)

२. अद्यावत स्वाक्षरी (Only JPG or JPEG; Size between 20 - 50 KB)

## ❖ प्रशिक्षणार्थींना देण्यात येणाऱ्या सोयी - सुविधा :

- नवी दिल्ली येथील श्रीराम'स आय.ए.एस. या प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेतांना प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास दर महिन्यास रु. १२,०००/- इतके विद्यावेतन देण्यात येईल .
- सदर विद्यावेतानासाठी प्रशिक्षणार्थींची हजेरी किमान ७५% असणे बंधनकारक आहे. संबधित प्रशिक्षण संस्थेकडून प्रत्येक महिन्याचे उपस्थिती पत्रक प्राप्त झाल्यावरच प्रशिक्षणार्थींच्या बँक खाती विद्यावेतनाची रक्कम DBT द्वारे वर्ग करण्यात येईल. कोणताही प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणास उपस्थित राहत नसेल अथवा ७५% पेक्षा कमी हजेरी असल्यास विद्यावेतानासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेवर दबाव आणल्यास सदर प्रशिक्षणार्थीस अपात्र ठरवण्यात येईल.
- पुस्तक खरेदीकरिता प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास **एकदाच** एकत्रित रक्कम रु. १४,०००/- देण्यात येईल.

- नवी दिल्ली येथील श्रीराम'स आय.ए.एस. या प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षणाच्या सुरवातीस जाण्याकरिता व प्रशिक्षण संपल्यानंतर परतीच्या प्रवासासाठी रु. २०००/- इतकी रक्कम प्रवास भत्ता व प्रवास खर्च म्हणून प्रशिक्षणार्थींच्या बँक खाती सदर रक्कम DBT द्वारे वर्ग करण्यात येईल.
- सदरचा प्रशिक्षण कार्यक्रम अनिवासी व नियमित स्वरूपाचा आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली निवास व्यवस्था स्वतः करावयाची आहे. तसेच जितके कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम आहे तो नियमितपणे पूर्ण करणे अनिवार्य आहे.

**वर नमूद सर्व कागदपत्रांसोबत सबंधित भरलेल्या मूळ अर्जाची प्रत, परीक्षा प्रवेश पत्र इ. बाबी डाऊनलोड करून ठेवावी व मूळ कागदपत्रे तपासणीच्या वेळेस डाऊनलोड केलेल्या अर्जाची प्रत देणे आवश्यक आहे. प्रवेश घेते वेळेस जर उमेदवारांनी उपरोक्त नमूद कागदपत्राची पूर्तता न केल्यास या योजनेचा लाभ देता येणार नाही. उपरोक्त नमूद सबंधित भरलेला अर्जाची मूळ प्रत, परीक्षा प्रवेश पत्र, नमूद सर्व मूळ कागदपत्रांच्या पडताळणी करण्याच्या "अटी व शर्ती" च्या अधीन राहून गुणवत्ता यादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात येईल. मूळ अर्जासह सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रतीचा एक सेट अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयात जमा करावा लागेल यांची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**प्रवेश परीक्षा, प्रवेश पत्र, गुणवत्ता यादी / प्रतीक्षा यादी, कागदपत्रे तपासणी/पडताळणी, तसेच इतर प्रक्रिया बाबतची सर्व अद्यावत माहिती www.trti.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात येईल. याबाबतची कोणतीही माहिती कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक स्वरुपात/लेखी कळविण्यात येणार नाही.**

सदर योजनेचा आढावा घेण्यासाठी व अंमलबजावणीत काही अडचणी आल्यास उचित बदल करून त्यास मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना असतील.

## प्रशिक्षणार्थींसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाविषयी महत्वाच्या सुचना

चाळणी परीक्षेत (CET) प्राप्त गुणांवर आधारीत १०० उमेदवारांची गुणवत्ता यादी व ५० उमेदवारांची प्रतिक्षा यादी trti.maharashtra.gov.in या website वरच प्रकाशित केली जाईल. सदर यादी प्रसिद्ध झाली आहे कि नाही याबाबत उमेदवाराने website ला जाऊन तपासावे. TRTI कडून निकालाबाबत कुठलाही पत्रव्यवहार किंवा दुरध्वनीद्वारे आपणास संपर्क साधला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०० गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी व ५० प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी trit.maharashtra.gov.in वर जाहीर केलेल्या कालावधीत आपल्या नजीकच्या अनुसूचित जमात पडताळणी समिती कार्यालयाकडे कागदपत्रांसह उपस्थित राहून कागदपत्रे तपासून घ्यावीत व संबधित कार्यवाही पूर्ण करावी. गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी विहीत मुदतीत कागदपत्र पडताळणी करणे बंधनकारक आहे. तसेच trti.maharashtra.gov.in च्या website वर जाहिर

केलेल्या शेवटच्या मुदतीपर्यंतच निवड यादी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करून घेण्याची संधी उपलब्ध असणार आहे.

जर १०० गुणवत्ता यादीतील व ५० प्रतिक्षा यादीतील उमेदवाराकडे काही अपवादात्मक परिस्थीतीत बंधनकारक असलेले कागदपत्र कमी असेल तर त्याने अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे ते विहीत मुदतीतच ते सादर करणे बंधनकारक आहे. तो अर्ज स्वीकृत/अस्वीकृत करणे याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त, आसंप्रसं, पुणे यांचेकडे राहील. याबाबत इतर उमेदवारांचे आक्षेप ग्राहय धरले जाणार नाही.

प्रवेश (Admission) घेण्याची अंतीम मुदत trti.maharashtra.gov.in च्या website वर जाहिर करण्यात येईल. शेवटच्या मुदतीपर्यंतच गुणवत्ता यादीतील १०० उमेदवारांना प्रवेश (Admission) घेण्याची संधी असणार आहे. विहीत मुदत संपल्यावर प्रतीक्षा यादीतील ५० उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांची निवड झाल्यानंतर त्यांनी तात्काळ दिल्ली प्रशिक्षण संस्थेत रुजू होणे बंधनकारक असेल व ७ दिवसाच्या आत रुजू करण्याचे हमीपत्र या कार्यालयास जमा करावे. जे उमेदवार दिलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत रुजू होत नाहीत, अशा उमेदवारांची निवड रद्द करून प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करून त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**अपवाद** – महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा इतर स्पर्धा परीक्षेच्या मुलाखत किंवा इतर बाबी संदर्भात समस्या उद्भवल्यास त्याची कारणमिमांसा करून योग्य निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रशिक्षणास ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे परंतु प्रशिक्षणार्थी गंभीर आजारी पडणे, अपघात होणे, इतर स्पर्धा परीक्षांना उपस्थित राहणे (नैसर्गिक आपत्ती/कौटुंबिक समस्या/वैद्यकीय कारण) या कारणामुळे कोचिंग क्लासेसला अनुपस्थित असल्यास अपवादात्मक परिस्थितीमध्ये (संबधित अनुपस्थितीचे डॉक्टरांचे प्रमाणपत्र/ परीक्षेचे प्रवेशपत्र सादर करणे अनिवार्य आहे.) प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन अदा करण्याबाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचा असेल.

जर कोणत्याही उमेदवारास निवड प्रक्रियेतील कोणत्याही मुद्यावर काही शंका असल्यास cevt.trti@gmail.com वर विहीत नमून्यात अर्जाद्वारे विचारणा करण्यात यावी. दूरध्वनीद्वारे संपर्क करून कोणत्याही शंकांचे निरसन करण्यात येणार नाही. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी दिल्ली येथील श्रीराम'स आय.ए.एस. अकॅडमी यांची निवड करण्यात आली आहे. सदर संस्थेस सामान्य अध्ययन या विषयाची पूर्व + मुख्य परीक्षा तसेच मुलाखत तयारी व वैकल्पिक विषय तयारी, व्याख्यातांचे मानधन, स्टडी मटेरियल, नोट्स (वाचन साहित्य) टेस्ट सेरीज, आवश्यक वर्तमानपत्र, मासिके, पुस्तके, स्टेशनरी इ. पुरविणे तसेच प्रशिक्षणाच्या इतर अनुषंगिक खर्च यासाठी फी अदा करण्यात येईल.

## ▪ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कार्यक्रमात देण्यात येणाऱ्या सोई – सुविधा

१. प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या व प्रवेश दिलेल्या उमेदवारास रु. १२,०००/- प्रती माह विद्यावेतन देण्यात येईल.

२. प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या प्रत्येक उमेदवारांस एकदाच रु. १४,०००/- पर्यंत किमतींचा पुस्तक संच खरेदीसाठी रक्कम त्यांच्या बँक खाती वर्ग करण्यात येईल.

३. प्रशिक्षणार्थींची प्रती माह किमान ७५ टक्के हजेरी असणे बंधनकारक आहे. प्रवेश घेतलेल्या संस्थेकडून प्रत्येक महिन्याचे उपस्थिती पत्रक प्राप्त झाल्यावरच प्रशिक्षणार्थींच्या बँक खाती विद्यावेतनाची रक्कम DBT द्वारे वर्ग करण्यात येईल. जो पर्यंत उपस्थिती पत्रक प्राप्त होत नाही तो पर्यंत कोणत्याही उमेदवाराला DBT देता येणार नाही. तसेच उपस्थिती पत्रकात ज्या प्रमाणे उपस्थिती असेल त्यानुसारच DBT वर्ग करण्यात येईल. त्यामुळे कोणत्याही प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षणास उपस्थित न राहता अथवा ७५ टक्के पेक्षा कमी हजेरी असल्यास विद्यावेतनासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेवर दबाव आणल्यास सदर प्रशिक्षणार्थीस अपात्र ठरवण्यात येईल.

४. सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा निःशुल्क व अनिवासी असल्याने उमेदवारांना सदर प्रशिक्षणासाठी दिल्ली येथे जाणे व परत येणे (एकदाच) यासाठी रु. २०००/- प्रवास खर्च देण्यात येईल. उमेदवाराला या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा कोणत्याही कारणांसाठी भत्ता देण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**या योजनेच्या अधिक माहितीसाठी कृपया आदिवासी विकास विभाग यांचा, शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण २०२१ /प्र.क्र. ३४/का.०९, दिनांक २० एप्रिल, २०२१ वाचा. उमेदवारास आवेदन पत्र भरणे (Application Form) तसेच सबंधित इतर तांत्रिक अडचणी असल्यास अधिक माहितीसाठी वेबसाईटवर देण्यात आलेल्याच हेल्पलाईन क्रमांक 8956894140 वर व contact@trtipune.in याच ईमेल आय. डी. वर संपर्क साधावा. आवेदन पत्राबाबत (Application Form) किंवा त्यासंबधित येणाऱ्या तांत्रिक अडचणीबाबत किंवा सदर प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत उमेदवारांनी TRTI कार्यालयाच्या इतर कोणत्याही विभागाच्या क्रमांकावर संपर्क साधू नये. स्पर्धा परीक्षेबाबत कोणतीही माहिती किंवा चौकशी करावयाची असल्यास उमेदवारांनी फक्त आणि फक्त याच ०२० - २६३६२०७१ दूरध्वनी वर संपर्क साधावा. तसेच उपरोक्त सर्व सूचना वाचून व्यवस्थितरीत्या खात्री करूनच सदर योजनेचा अर्ज भरावा.**

**सर्व उमेदवाराना परीक्षेसाठी All The Best!**

(चंचल पाटील)
सहसंचालक